झाडे कापली असल्यास चौकशी –आयुक्त

प्रतिनिधी

मुंबई, गुरुवार : मेट्रो रेल्वे ३च्या कारशेडच्या बांधकामातील झाडे कापण्याचा प्रस्ताव मंजूर केल्यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे. पुन्हा एकदा पर्यावरणप्रेमींनी रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, आयुक्तांनी आचारसंहितेच्या भीतीमुळेच हा प्रस्ताव मंजूर करण्याची घाई केली असल्याची बाब समोर आली. कारशेडच्या जागेतील अनेक झाडे कापल्याचा आरोप होत असताना, आयुक्तांनी मात्र ही झाडे तुटली असल्याचे कबूल केले आहे. पण, जर ही झाडे कापली असे सदस्यांचे म्हणणे असेल, तर त्यांची चौकशी केली जाईल, असे आश्वासन आयुक्तांनी प्राधिकरणाला दिले होते. दरम्यान, प्राधिकरणाच्या सदस्य शशीरेखा सुरेशकुमार यांनी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा आयुक्तांना सादर केला आहे.

मेट्रो रेल्वेच्या आरे कॉलनीतील कारशेडच्या बांधकामात बाधित होणारी झाडे कापण्याचा आणि पुनर्रोपित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि शिवसेना नेते आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याप्रकरणी शिवसेनेने न्यायालयात जाण्याची जोरदार तयारी केली आहे. तसा अर्ज यशवंत जाधव यांनी बुधवारी न्यायालयात केला आहे. प्राधिकरणाच्या बैठकीत आयुक्त प्रविण सिंह परदेशी यांनी प्रशासनाची बाजू भक्कमपणे मांडण्याचा प्रयत्न केला होता. आरेची जमीन ही वन्य जमीन नसून यावर आरक्षण असल्याने त्यावर वनकायदा लागू होत नसल्याचे त्यांनी म्हटले होते. या जमिनीवर आदिवासींची घरे नाहीत. या क्षेत्रावर सुबाभळाची झाडे आहेत. नैसर्गिक झाडांवर आदिवासी जगतात. ही झाडे नैसर्गिक नाहीत. या झाडांवर आदिवासींचा उदरनिर्वाह चालत नाही. काही झाडे पडली आहेत आणि काही झाडे परवानगी घेऊन कापण्यात आली आहेत. परवानगी न घेता कोणतीही झाडे तोडली आहेत, असे आपण म्हणत असाल तर अजून चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी आयुक्तांनी दिले. कारशेडसाठी तोडल्या जाणाऱ्या २७०२ झाडांमुळे पर्यावरणातील १० टक्के ऑक्सिजनचे प्रमाण कमी होईल. तर वाहनांमुळे निर्माण होणारा कार्बनडायॉक्साईड मेट्रोमुळे १०० पट कमी होणार आहे. आपल्याकडे सार्वजनिक वाहतूक केवळ २० ते ३० टक्के एवढी आहे. मेट्रोमुळे सार्वजनिक वाहतुकीचे प्रमाण वाढेल. पण या जमिनीवर कोणतीही याचिका नाही. त्यामुळे न्यायालयाचे उल्लंघन होणार नाही.

■ आचारसंहितेमुळे प्रस्ताव घाईत मंजूर?

१० सप्टेंबरला निवडणूक आचारसंहिता लागणार आहे. त्यामुळे प्रस्ताव लवकर मंजूर करणे आवश्यक असल्याचे मतही आयुक्तांनी मांडले होते. तीन बैठकांमध्ये चर्चा करूनही या प्रस्तावावर ठोस निर्णय होत नसेल तर योग्य नाही, असे सांगत उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे मेट्रो प्रकल्पाला आधीच खूप जास्त विलंब झालेला आहे. नागरिकांवर ताण पडू नये म्हणून हा निर्णय घेतो आहे. पुढील बैठकीत हा प्रस्ताव मंजूर करणार असाल तर हा प्रस्ताव पुढे ढकलता येईल असे सांगताच आयुक्तांनी स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी दप्तरी दाखल करण्याची उपसूचना मताला टाकत बहुमताच्या जोरावर झाडे तोडण्याचा मूळ प्रस्ताव मंजूर केला होता.

■ शशीरेखा सुरेशकुमार यांचा राजीनामा

झाडांचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी केलेले आरोप यामुळे न्यायालयाच्या निर्देशांनुसार नेमणूक केलेल्या पाच सदस्यांपैकी डॉ. शशीरेखा सुरेशकुमार यांनी सदस्यत्वाचा राजीनामा महापालिका आयुक्तांना मेलद्वारे पाठवला आहे. डॉ. शशीरेखा यांनी आपण हा राजीनामा पाठवला असल्याचे सांगितले आहे.

आरेतील झाडे तोडण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी प्रशासनाचा दबाव

प्रतिनिधी

मुंबई, गुरुवार : मेट्रो रेल्वे ३ प्रकल्पासाठी 'आरे'तील झाडे कापण्याच्या प्रस्ताव मंजूर केल्यानंतर याची प्रमाणित प्रत मिळवण्यासाठी प्रशासनाला कसरत करावी लागत आहे. जोरदार प्रयत्न सुरू आहे. आयुक्तांनी तीन ते चार वेळा चिटणीसांना आपल्या दालनात बोलवूनही त्यांनी ही प्रत देण्याबाबत कोणताही निर्णय न घेल्याने अखेर आयुक्तांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त आबासाहेब जऱ्हाड, अतिरिक्त आयुक्त विजय सिंघल तसेच सह आयुक्त चंद्रशेखर चौरे यांनी चिटणीस यांच्या कार्यलयाकडे धाव घेतली व त्यांच्यावर दबाव आणण्यास सुरुवात केली. चिटणीस यांनी थेट आपल्या दालनात यायला भाग पाडल्याने सनदी अधिकाऱ्यांच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचला आहे. त्यामुळे याची किंमत मोजावी लागेल असा गर्भित इशारा त्यांनी दिल्याचे बोलले जात आहे.

आरेतील मेट्रो प्रकल्प ३ साठी उभारण्यात येणाऱ्या कारशेडच्या बांधकामात अडथळा ठरणारी झाडे आरेतील झाडे कापण्याचा प्रस्ताव शिवसेनेच्या विरोधानंतरही आयुक्तांनी तो बहुमताच्या जोरावर मंजूर केला होता त्यासाठी आधीपासूनच त्यांनी प्लान केला होता असा आरोप शिवसेनेने केला होता. त्यामुळे आता शिवसेनेनेही त्यांना कोंडीत पकडण्यास सुरुवात केली आहे. एखादा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्या मंजूर प्रस्तावाची प्रमाणित पत्र मिळाल्यानंतरच कार्यादेश दिला जातो. किंबहुना त्या आधारे कामाला सुरुवात केली जाते. त्यामुळे वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर याची प्रमाणित पत्र, प्रशासनाला देण्यात येवू नये, असे पत्रच स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी महापालिका चिटणीस यांना पाठवले आहे. मात्र, दुसरीकडे आयुक्त प्रविणसिंह परदेशी यांनी याची प्रमाणित प्रत मिळावी म्हणून चिटणीस यांच्यावर दबाव आणण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पालिका चिटणीस अडचणीत सापडले आहेत. तब्बल तीन ते चार वेळा आयुक्तांनी, चिटणीस प्रकाश जेकटे यांना आपल्या दालनात बोलावून घेतले. परंतु रात्रीपर्यंत चिटणीस यांनी नियमावर बोट ठेवल्यामुळे प्रमाणित प्रत मिळवण्याचा प्रयत्न असफल ठरला. त्यामुळे आयुक्तांनी, सहआयुक्त चंद्रशेखर चौरे यांच्यावर हे काम फत्ते करण्याची जबाबदारी सोपवली. सोबतीला अतिरिक्त आयुक्त आबासाहेब जऱ्हाड यांना पाठवले. त्यामुळे दोघेही चिटणीस यांच्या कार्यालयात ठाण मांडून बसले. आयुक्त अधिकाऱ्यांना पाठवून दबाव आणत असल्याची माहिती स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांना समजताच त्यांनीही चिटणीस यांचे कार्यालय गाठले. त्यावेळी चौरे तिथे बसलेले दिसले. मात्र जाधव यांनी विचारणा करताच ते गोंधळले. त्यामुळे चौरे यांनी ही माहिती एसएमएस द्वारे आयुक्तांना दिली. त्याबरोबर अतिरिक्त आयुक्त विजय सिंघल तिथे आले. यावेळी त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. पण त्यानंतर सिंघल, चिटणीस यांना बाहेर घेऊन गेले.

दोन अतिरिक्त आयुक्तांच्या माध्यमातून आयुक्तांनी हा दबाव वाढवल्याचे दिसत होते. स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी आपण महापालिका चिटणीस यांना प्रमाणित प्रत देवू नये, असे पत्र दिल्याचे कबुल केले आहे. आयुक्तांनी खेळलेल्या रडीचा डावाबद्दल त्यांना धडा शिकवणार, असा यशवंत जाधव यांनी निर्धार केला आहे. आयुक्त हे स्वत: प्रयत्न करत आहेत शिवाय अतिरिक्त आयुक्त आबासाहेब जऱ्हाड आणि विजय सिंघल तसेच सह आयुक्त चंद्रशेखर चौरे यांना पाठवून मंजूर प्रस्तावात बदल करत प्रमाणित प्रत मिळवण्याचा प्रयत्न करत आहे.असे यशवंत जाधव यांचे म्हणणे आहे.

यशवंत जाधव यांचा आरोप

आपण तिथे जेव्हा पोहोचलो तेव्हा हे तिघे तिथे होते आणि आपल्याला पाहून गोंधळले. तसेच चिटणीस यांना कागदपत्रे घेऊन बाहेर नेले. त्यावेळी आयुक्त आपल्या दालनात होते. त्यामुळे असा दबाव आणून त्यात बदल केला जात असल्याचा आरोप यशवंत जाधव यांनी केला. एका छोट्या कामासाठी आम्हाला तुमच्या कार्यालायत यावे लागले, हे लक्षात ठेवा. तुम्ही काय मोठे लागून गेला आहात काय, याची किंमत तुम्हाला मोजावी लागेल, असा दमच सिंघल यांनी चिटणीस यांना दिल्याचे यशवंत जाधव यांनी सांगितले.

दरम्यान,झाडे कापण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाने गैर मार्गाने प्रस्ताव मंजूर केल्याने याविरोधात शिवसेनेने न्यायालयात जाणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार शिवसेनेने तयारी केली असून स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी आम्ही या निर्णयाविरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्यासाठी अर्ज केला आहे, असे सांगितले.

नो पार्किंग रस्यावर अतिरिक्त बस सोडणार - बेस्ट उपक्रम

मुंबई, गुरुवार : मुंबई महानगरपालिका आणि वाहतूक पोलीस यांनी महर्षी कर्वे मार्ग, एस. व्ही. रोड, गोखले रोड, न्यू लिंक रोड आणि एल.बी.एस रोड या पाच मुख्य मार्गावर वाहनांची वाहतूक सुरळीत चालण्याकरिता ' नो पार्किंग क्षेत्र' घोषित केले आहे. या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सोयीकरिता बेस्ट उपक्रमाकडून या बसमार्गावर पूरेशा प्रस्थांतराने बसगाड्या प्रवर्तित करण्यात येतील. सदर मार्गावरील प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार ज्यादा प्रवासी मागणी पूर्ण करण्याकरिता अतिरिक्त बसगड्या प्रवर्तित करण्यात येतील. तसेच प्रवाशांच्या मदतीकरिता गर्दीच्या ठिकाणी मार्ग पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात येईल.

७ व १२ सप्टेंबर रोजी बेस्टची वीजदेयक भरणा केंद्र सकाळी ११ वाजेपर्यंत उघडी

मुंबई, गुरुवार : गौरी गणपती विसर्जनानिमित्त शनिवारी ०७/०९/२०१९ व गणपती विसर्जनानिमित्त गुरुवारी १२/०९/२०१९ रोजी सकाळच्या सत्रातील सर्व विद्युतदेयके भरणा केंद्रे सकाळी ११.०० वाजेपर्यंत चालू राहतील. दुपारच्या सत्रातील सर्व वीजदेयक भरणा केंद्रे पूर्णत: बंद राहतील. वीजग्राहकांच्या सोयीसाठी इलेक्ट्रिक हाऊस (कुलाबा),दादर व अन्सिलरी बिल्डिंग (वडाळा बस डेपो) येथील वीजदेयक भरणा केंद्रे नेहमीप्रमाणे चालू ठेवण्यात येतील.

तोंडापर्यंत आलेला घास हिराऊ नका

मेट्रोप्रकरणी आयुक्त प्रवीणसिंह परदेशी यांचे स्थायी समितीत आवाहन

■ **मुंबई**

मेट्रो रेल्वे हा विकासाचा मार्ग आहे. मेट्रोचे काम बरेचसे काम पूर्ण होत आले आहे. तोंडापर्यत घास आला आहे. त्यात काही ना काही कारणांनी अडचणी निर्माण करू नका, असे कळकळीचे आवाहन आयुक्त प्रवीणसिंह परदेशी यांनी स्थायी समितीत केले. स्थायी समिती सभेच्या सुरुवातीलाच सभागृह नेत्या विशाखा राऊत यांनी मट्रो कारशेडसाठी वृक्षप्राधिकरणाने आरे कॉलनीतील वृक्षतोडीला दिलली मंजुरी आणि त्याविरोधात एका वृक्षप्रेमीने उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका यामुळे सभातहकुबी मांडली होती. या गंभीर विषयासाठी आयुक्त प्रवीणसिंह परदेशी सभागृहात उपस्थित होते. मेट्रो रेल्वे, मेट्रो कारशेड आणि वृक्षतोड याबाबत बाजूने आणि विरोधात असलेली नगरसेवकांची मते जाणून घेतल्यानंतर आयुक्त बोलत होते.

आयुक्त म्हणाले की, मेट्रो रेल्वे हा विकासाचा मार्ग आहे. या रेल्वेचे मार्ग बरेचसे पूर्ण होत आले आहे. म्हणजे घास तोंडापर्यंत आला आहे, तो घास हिराऊन घेऊ नका, असे त्यांनी नकळतपणे नगरसेवकांना सुनावले. नगरसेवकांनी मांडलेल्या विविध मुद्द्यांची त्यांनी मुद्देसूदपणे उत्तरे दिली.

■ कांजूरमार्गाची जागा गोत्यात आणणारी

आयुक्त म्हणाले की, मेट्रो कारशेडसाठी आरे कॉलनीचीच जागा का, कांजूर मार्गची जागा का नाही, असा अनेकांचा प्रश्न आहे. कांजूरमार्गची जागा वैयक्तिक मालकीची आहे. शिवाय ती कोणाची आहे हे निश्चित नाही. त्यासाठी दोघांचे भांडण आहे. शिवाय ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालू आहे. त्या जागेची किंमत ५००० कोटी रुपये आहे. जागेची किंमत आणि न्यायालयीन प्रक्रिया व इतर कामासाठी ५००० कोटी अतिरिक्त खर्च लक्षात घेता यासाठी मोठा खर्च येणार आहे. शिवाय कामही लांबणीवर पडणार आहे. शिवाय ही शासकीय जागा नाही. शासकीय जागा उपलब्ध असताना खासगी जागेसाठी जनतेचा पैसा खर्च करणे ही गंभीर बाब आहे.

■ कारशेड मेट्रोचा आत्मा

मेट्रोचे एक टोक दक्षिणेत, तर कारशेड उत्तरेत (कांजूर मार्ग) असणे म्हणजे अतिरिक्त खर्च वाढतो. त्यासाठी दोन वर्षे विलंब लागला असता. कारशेड मध्यभागी असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आरेची जागा पसंत करण्यात आली. आरेची जागा शासकीय आहे. ती वनखात्याचीही नाही. त्यामुळे ती निश्चित करण्यात आली. कारशेड हा मेट्रोचा आत्मा आहे. इंजीन, बोगी यांचे मेंटेनन्स येथे केले जाते.

■ हरकतींना पोर्टलवर उत्तरे

मट्रो कारशेडबाबत ८३००० हरकती आल्या. त्यांना वैयक्तिक उत्तरे देणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांची उत्तरे महापालिकेच्या पोर्टलवर टाकण्यात आली आहेत. त्यांनी पुन्हा प्रश्न निर्माण केला नाही, म्हणजे त्यांना उत्तर पटलेले आहे, असे आयुक्त म्हणाले.

■ मेट्रोमुळे पर्यावरणाचे रक्षण

वृक्षतोड झाल्यास तापमान वाढेल, पर्यावरणाचा ऱ्हास होईल, असे सांगितले जाते. पण त्यातही तथ्य नाही. यूएनसीसी या जागतिक संघटनेने दिलेल्या अहवालानुसार मेट्रोमुळे दिवसाला ७ लाख ते ८ लाख लोक प्रवास करतील. २७०० झाडांमुळे जेवढे पर्यावरणाचे रक्षण होईल त्याच्या कितीतरी पटीने मेट्रोमुळे पर्यावरणाचे रक्षण होणार आहे, असेही आयुक्तांनी सप्रमाण पटवून दिले.

■ अशी वापरणार आरेची जागा

आरे कॉलनीची जागा १२०० हेक्टर आहे. त्यातील ३३ हेक्टर जागा मेट्रोसाठी वापरण्यात येणार आहे. म्हणजे एकूण जागेच्या अडीच टक्के जागा वापरण्यात येणार आहे. आरेतील एकूण वृक्ष ४९७००० आहेत. त्यातील २७०० वृक्ष तोडण्यात येणार आहेत. त्यातील वड, पिंपळाच्या वृक्षांवर कुऱ्हाड चालवण्यात येणार नाही. एका झाडाच्या बदल्यात ५ ते ६ झाडे लावण्यात येणार आहेत. शिवाय विकासकांनाही नियमावली तयार करण्यात आली आहे. त्यांनाही झाडे लावणे बंधनकारक करण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले.

■ आयुक्तांच्या आवाहनानंतरही सभा तहकूब

वृक्षप्राधिकरणाच्या बैठकीत शिवसेनाचा विरोध असतानाही वृक्षोतोडीचा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला होता. त्याचा वचपा आज शिवसेनेने घेतला. मेट्रोला विरोध नाही, मेट्रो कारशेडलाही विरोध नाही, फक्त वृक्षतोडीच्या निर्णयाला विरोध म्हणून शिवसेनेने कॉंग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या मदतीने स्थायी समिती सभा तहकुबीच्या बाजूने मत व्यक्त केले, तर भाजपने विरोधात मत व्यक्त केले.

मोदी सरकारच्या प्रतिमा संवर्धनासाठी काश्मीरमध्ये रिसॉर्ट बांधण्याचा एमटीडीसीचा घाट: सचिन सावंत

■ **मुंबई**

महाराष्ट्रातील एमटीडीसी रिसॉर्टची अवस्था अत्यंत दयनीय असून राज्यामध्ये पर्यटन वाढीकरिता अधिक गुंतवणुकीची गरज असताना काश्मीरमध्ये एमटीडीसीचे रिसॉर्ट बांधण्याचा निर्णय हा महाराष्ट्राचे हित डावलून महाराष्ट्राच्या जनतेचा पैसा मोदी सरकारच्या प्रतिमा संवर्धनाकरिता आणि काश्मीरबाबतचा मोदी सरकारचा निर्णय योग्य ठरविण्याकरिता खर्च केला जात आहे. अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत यांनी केली आहे. यासंदर्भात बोलताना सावंत म्हणाले की, महाराष्ट्रातील भाजप शिवसेनेचे सरकार गेली साडेचार वर्ष महाराष्ट्राचे हित डावलून मोदी सरकारच्या इशाऱ्यावर महाराष्ट्राच्या जनतेचे नुकसान करत आहे. या अगोदरही महाराष्ट्राचे पाणी गुजरातला वळवणे असेल. मुंबई येथे होणारे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र गुजरातच्या गिफ्ट सिटीमध्ये हलवण्याचा निर्णय असेल. यासोबत महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाची सरकारी कार्यालये व उद्योग प्रकल्प गुजरातला नेण्याचा प्रयत्न असेल किंवा केवळ गुजरातच्या फायद्यासाठी होणारी बुलेट ट्रेन असेल. महाराष्ट्राच्या भाजप शिवसेना सरकारने मोदींच्या इशा-यावरती महाराष्ट्राची कुचंबणा केली आहे. परंतु आज महाराष्ट्रावर प्रचंड कर्ज असताना तसेच बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड वाढले असताना महाराष्ट्रातच अधिक गुंतवणुकीची गरज आहे. इतर क्षेत्राबरोबरच पर्यटन क्षेत्रातही महाराष्ट्र मागे पडला आहे. कोकण असेल वा अन्य विभागात पर्यटन क्षेत्रासाठी अधिक गुंतवणुकीची आवश्यकता असताना महाराष्ट्राच्या जनतेचा पैसा काश्मीरमध्ये खर्च करण्याची आवश्यकता काय? असा संतप्त सवाल सावंत यांनी केला. केंद्रात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजपचे सरकार असताना केंद्राकडून महाराष्ट्रात जास्त गुंतवणूक यावी अशी अपेक्षा होती परंतु केंद्र सरकारकडून राज्याचाच निधी स्वत:च्या सत्तेचा दुरुपयोग करून मोदी सरकारच्या स्वार्थाकरिता इतरत्र वळवला जात आहे, हे दुर्दैवी आहे. काश्मीरमध्ये ३५ अ व ३७० कलम रद्द केल्यानंतर तिथे खासगी गुंतवणुकीची अपेक्षा आहे, राज्य सरकारांच्या गुंतवणुकीचा नाही. खासगी गुंतवणूकीकरिता कोणी तयार नसल्याने महाराष्ट्र सरकारला तिथे गुंतवणूक करण्याकरिता जबरदस्तीने भाग पाडले जात आहे असा आरोप सावंत यांनी केला व महाराष्ट्राच्या जनतेने निकराने हा डाव उलथून लावला पाहिजे, असे सावंत म्हणाले.

मुंबईतील अतीवृष्टीचा फटका मुंबईच्या डबेवाल्यांना ही बसला

■ **मुंबई**

मंगळवारपासून मुंबईत पाऊस पडत आहे सकाळी त्याचा जोर काहीसा कमी होता. डबेवाले सकाळी आपल्या नित्य कामावर आले येरवी दिवसा पेक्षा आजचे शेड्युल काहीसे उशीराने होते. मुंबईत जागो जागी पाणी भरले होते शक्य आहे ते डबे घेऊन डबेवाले कार्यालय गाठत होते. आणि आपल्या ग्राहकांना जेवू घालत होते. डबेवाले दुपारी २ वाजता रिकामी डबे घेऊन माघारी फिरले आणी पाऊसाचा जोर वाढला. जागो जागी पाणी भरले व मुंबईच्या लोकल बंद पडल्या. बंद पडलेल्या लोकल मध्ये डबेवाले अडकून पडले आहेत. सोबत तीस चाळीस डबे असल्या मुळे त्यांना लोकल सोडून ही जाता येईना. अशा प्रकारे डबेवाल्यांना पाऊसाचा फटका बसला. अशी माहिती मुंबई डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी सांगितले.

GlobalSpace

ग्लोबलस्पेस टेक्नोलॉजीस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयश्र ६०५, ६ वा मजला, बी-विंग, रुपा सॉलिटायर इमारत, मिलेनियम बिझनेस पार्क, नवी मुंबई ठाणे ४००७१०.
दूरध्वनीः ०२२-४९४५२०१५ ईमेल आयडीः investors@globlspace.in वेबसाईटः www.globlspace.in
सीआयएन क्र.: L64201MH2010PLC211219

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, ग्लोबलस्पेस टेक्नोलॉजीस लिमिटेडची ९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") **शुक्रवार दि. २७ सप्टेंबर, २०१९ रोजी दु. ३.०० वाजता रामदा हॉटेल, नवी मुंबई, १५६, मिलेनियम बिझनेस पार्क, एमआयडीसी, सेक्टर २, महापे, नवी मुंबई - ४००७१०** येथे एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्याकरिता घेण्यात येणार आहे. एजीएमच्या सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती आणि वि.व. २०१८-१९ करिता वार्षिक अहवाल सर्व सदस्यांना ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपेन्ट(स) कडे नोंदणीकृत आहेत त्यांना पाठविण्यात आल्या आहेत.त्या कंपनीची वेबसाईट www.globlspace.in वर देखील उपलब्ध आहेत. एजीएमच्या सूचनेच्या भौतिक प्रती आणि वि.व. २०१८-१९ करिता वित्तीय अहवाल इतर सर्व सदस्यांना मंजूर पद्धतीन त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठविण्यात आला आहे. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल भौतिक स्वरुपात पाठवणी आणि वार्षिक अहवालाची ईमेल द्वारे पाठवणी ३ सप्टेंबर, २०१९ रोजी पूर्ण झाली आहे.

शुक्रवार २० सप्टेंबर, २०१९ रोजी कट-ऑफ दिनांकास प्रत्यक्ष स्वरुपात किंवा डिमटेरिअलाईड्ड स्वरुपात भाग धारणा करणारे सदस्य एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण / विशेष कामकाजावर त्यांचे मत एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून सीडीएसएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे ("रिमोट ई-मतदान") देऊ शकतात. सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की:

१. एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण आणि विशेष कामकाज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करून करता येईल.
२. रिमोट ई-मतदान सोमवार २३ सप्टेंबर, २०१९ रोजी (स. ०९.००) सुरु होईल.
३. रिमोट ई-मतदान गुरुवार २६ सप्टेंबर, २०१९ रोजी (सायं. ०५.००) समाप्त होईल.
४. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा एजीएममध्ये मतदान करण्याकरिता पात्रता ठरविण्याची कट-ऑफ दिनांक **शुक्रवार २० सप्टेंबर, २०१९** आहे.
५. कोणी व्यक्ती, ज्याने एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे भाग घेतले असतील आणि कंपनीचा सदस्य बनला असेल आणि कटऑफ दिनांक म्हणजेच **शुक्रवार २० सप्टेंबर, २०१९** रोजी भाग धारण करीत असेल, तो खालील ईमेल आयडी वर विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकेल :
   १. cs@globalspace.in
   २. helpdesk.evoting@cdslindia.com
   ३. suman.shetty@linkintime.co.in

सदस्यांनी नोंद घ्यावी की,:
अ) रिमोट ई-मतदान यंत्रणा उपरोल्लेखित दिनांक आणि वेळेनंतर मतदानाकरिता सीडीएसएलद्वारे बंद करण्यात येईल आणि सदस्याने एकदा ठरावावर मतदान केल्यानंतर, सदस्यास ते त्यानंतर बदलता येणार नाही.
ब) मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा एजीएममध्ये उपलब्ध करून दिली जाईल.
क) ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांते मत दिलेले असेल ते देखील एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतु ते त्यांचे मत पुन्हा देऊ शकणार नाहीत.
ड) कट-ऑफ दिनांकापर्यंत ज्या व्यक्तीचे नाव डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात येणाऱ्या सदस्यांचे नोंदपट किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदपटामध्ये नोंद झाले असेल ते रिमोट ई-मतदान तसेच एजीएममध्ये मतपत्रिकेद्वारे मतदानाची सुविधा मिळवू शकतात.

एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.globlspace.in वर आणि सीडीएसएलची वेबसाईट https://www.evotingindia.com/ वर देखील उपलब्ध आहे आणि कोणतीही शंका असल्यास, सदस्य https://www.evotingindia.com/ च्या हेल्प विभागामध्ये सदस्यांकरिता सतत विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि सदस्यांकरिता ई-मतदान युजर मॅन्यूअलचा संदर्भ घेऊ शकतात किंवा श्रीमती स्वाती अरोरा, कंपनी सचिव आणि कंपनीच्या अनुपालन अधिकारी, ईमेल : cs@globalspace.in यांना संपर्क साधू शकतात.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
स्वाती अरोरा
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
मेंबरशीप क्र. : एअ४५२१

PETRON ENGINEERING KazStroyService Group Company

पेट्रॉन इंजिनिअरिंग कन्स्ट्रक्शन लि.,

नोंद. कार्या.: ६ वा मजला, स्वस्तिक चेंबर्स, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.
दूर.: +९१-२२-४०८५६२०० फॅक्सः +९१-२२-४०८५६२५०
वेबसाईटः www.petronengineering.com
इमेलः corporate@petronengineering.com
सीआयएन क्र. L45202MH1976PLC019135

४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, पेट्रॉन इंजिनिअरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेडच्या सदस्यांची **४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर, २०१९ रोजी दु. २.०० वाजता** कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ येथे एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज करण्याकरिता घेण्यात येणार आहे.

वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल आणि उपस्थिती पावती, ज्या सदस्यांचे ईमेल आयडी कंपनी / रजिस्ट्रार आणि भाग हस्तांतरण एजंट्सकडे उपलब्ध आहेत त्यांना ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने आणि ज्या सदस्यांची त्यांचे ईमेल आयडी कंपनीकडे नोंद केलेले नाहीत त्यांना भौतिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. सदर वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.petronengineering.com वर उपलब्ध आहे आणि ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवसापर्यंत कामकाजाच्या सर्व दिवशी शनिवार वगळता, कामाच्या वेळेत, पाहणीसाठी उपलब्ध आहे. वार्षिक अहवाल/ई-पत्रव्यवहार पाठवणी दि. ०४ सप्टेंबर, २०१९ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

एजीएममध्ये विचार करण्यासाठी घ्यावयाच्या ठरावावर सदस्यांना त्यांचे मत देण्याचा हक्क सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिस लिमिटेड (सीडीएसएल) द्वारे देण्यात येत असलेल्या ईलेक्ट्रॉनिक मतदान (ई-मतदान) सेवेद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बजावण्यासाठी ई सेवा पुरवण्यास कंपनीस आनंद होत आहे. कट-ऑफ दिनांक म्हणजेच २१ सप्टेंबर, २०१९ रोजी भौतिक अथवा डीमटेरिअलाईज्ड स्वरुपात भाग धारण करणारे सदस्य एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देऊ शकतात.

सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की :

१. ई-मतदान कालावधी सोमवार, दि. २३ सप्टेंबर, २०१९ रोजी स. ९.०० वाजता सुरु होईल आणि गुरुवार, दि. २६ सप्टेंबर, २०१९ रोजी सायं. ५.०० वाजता समाप्त होईल. या कालावधीदरम्यान, कट-ऑफ दिनांक म्हणजेच शनिवार, २१ सप्टेंबर, २०१९ रोजी भौतिक स्वरुपात किंवा डीमटेरिअलाईज्ड स्वरुपात भाग धारण केलेले कंपनी भागधारक त्यांचे मत ईलेक्ट्रॉनिक पद्धतीन देऊ शकतात. ई-मतदान यंत्रणा सीडीएसएल द्वारे त्यानंतर मतदानाकरिता बंद करण्यात येईल.
२. भौतिक स्वरुपात भाग धारण करणारे सदस्य त्यानंतर थेट कंपनी निवड पटलावर पोहोचतील. तथापी, डीमॅट स्वरुपात भाग धारण करणारे सदस्य आता 'पासवर्ड बनविणे' मेनू वर पोहोचतील, जेथे त्यांना अनिवार्यपणे नवीन पासवर्ड क्षेत्रामध्ये त्यांचा लॉगईन पासवर्ड टाकावा लागेल. कृपया नोंद घ्यावी की हा पासवर्ड डीमॅट धारक इतर कोणत्याही कंपनीच्या ठरावावर, जेथे ते मतदान करण्यास पात्र असतील, आणि त्या कंपनीने सीडीएसएल प्लॅटफॉर्मवरुन ई-मतदानाची निवड केलेली असल्यास, तेथे मतदान करण्यास वापरु शकतील. तुमचा पासवर्ड इतर कोणत्याही व्यक्तीस समजू न देण्याची आणि तुमचा पासवर्ड गोपनिय ठेवण्याची जास्तीत जास्त काळजी घ्यावी अशी जोरदार शिफारस केली जात आहे.
३. सदस्यांनी नोंद घ्यावी कीः
   अ. ज्या सदस्यांनी एजीएम पूर्वी त्यांचे मत रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मत दिलेले आहे ते देखील एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांचे मत पुन्हा देण्यास ते पात्र नसतील.
   ब. कोणी व्यक्ती, ज्याने वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे भाग घेतले असतील आणि कंपनीचा सदस्य बनला असेल आणि कटऑफ दिनांक म्हणजेच गुरुवार, दि. ५ सप्टेंबर, २०१९ रोजी भाग धारण करीत असेल, तो rnt.helpdesk@linkintime.co.in येथे विनंती पाठवून अनुक्रम क्रमांक (डीपॉझिटरी पार्टिसिपन्ट/कंपनी/रजिस्ट्रार आणि हस्तांतरण एजन्ट यांच्याकडे पॅनची नोंदणी न केलेली असल्यास लागू) मिळवू शकतील.
४. ई-मतदानासंबंधी कोणतेही प्रश्न अथवा शंका असल्यास तुम्ही www.evotingindia.co.in च्या हेल्प विभागामध्ये उपलब्ध सतत विचारले जाणारे प्रश्न ("FAQs") आणि ई-मतदान मॅन्यूअल चा संदर्भ घ्यावा किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल पाठवावा.

सदस्यांचे नोंदपट आणि भाग हस्तांतरण पुस्तके शनिवार, दि. २१ सप्टेंबर, २०१९ ते शुक्रवार दि. २७ सप्टेंबर, २०१९ (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कारणास्तव बंद राहतील.

ठिकाण : मुंबई — **पेट्रॉन इंजिनिअरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड करिता**
दिनांकः ४ सप्टेंबर, २०१९ — **ठराव व्यावसायिक**

रोज मर्क लिमिटेड

सीआयएन क्र.: L24110MH1985PLC035078
नोंद कार्या.: कार्यालय क्र. जी-२, तळ मजला, भाग-अ, मंगल महेश, १४ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई - ४०००५२, महाराष्ट्र
दूरध्वनीः +९१-२२-२६०००७५०, **ईमेलः** rmltd1985@gmail.com
वेबसाईटः www.rosemercltd.com

कंपनीच्या (३५ व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेची, बुक क्लोजर आणि ई-मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, रोज मर्क लिमिटेड ("कंपनी") च्या भागधारकांची पस्तिसावी (**३५ वी**) **वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार, सप्टेंबर २७, २०१९ रोजी दु. २.०० वाजता** कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय - कार्यालय क्र. जी-२, तळ मजला, भाग-अ, मंगल महेश, १४ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई - ४०००५२, महाराष्ट्र येथे सूचनेमध्ये नमूद केलेले साधारण आणि विशेष कामकाज करण्याकरिता घेण्यात येणार आहे.

एजीएमच्या सूचनेची प्रत आणि रिमोट ई-मतदानाच्या सूचना, व त्यासह उपस्थिती पावती आणि प्रॉक्झी फॉर्म आणि वार्षिक अहवाल २०१८-२०१९ सदस्यांना मंजूर पद्धतीने सप्टेंबर ०३, २०१९ रोजी पाठविण्यात आले आहेत. उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र सदस्य त्याच्या ऐवजी/तिच्या ऐवजी उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास प्रॉक्झी नेमण्याकरिता पात्र असेल आणि प्रॉक्झी हा कंपनीचा सदस्य असणे आवश्यक नाही. प्रॉक्झीज प्रभावी ठरण्याकरिता, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या पूर्वी ४८ तास आधी योग्य रित्या शिक्का मारुन, स्वाक्षरी करुन जमा करावे.

एजीएमकरिता बुक क्लोजरः
याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि इतर लागू तरतुदी आणि सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन २०१५ च्या नियमन ४२ अन्वये, एजीएमच्या कारणास्तव सदस्यांचे नोंदपट आणि कंपनीचे भाग हस्तांतरण पुस्तके शुक्रवार २०, २०१९ ते शुक्रवार सप्टेंबर २७, २०१९ (दोन्ही दिवस अंतर्भूत) पर्यंत बंद राहतील.

रिमोट ई-मतदानः
कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४, दुरुस्ती केल्यानुसार, च्या नियम २० आणि सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन २०१५ च्या नियमन ४४ सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ नुसार, कंपनी त्यांच्या भागधारकांना ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यास प्रस्तावित सर्व ठरावांवर एनएसडीएलद्वारे पुरविण्यात आलेल्या ई-मतदान सेवेद्वारे रिमोट ई-मतदानाद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मत देण्याची सुविधा पुरवित आहे. रिमोट ई-मतदानाचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

अ. रिमोट ई-मतदान मंगळवार, सप्टेंबर २४, २०१९ (स. ९.००) रोजी सुरु होईल आणि गुरुवार, सप्टेंबर २६, २०१९ (सायं. ५.००) रोजी समाप्त होईल.
ब. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा ३५ व्या एजीएममध्ये मतदान करण्याची पात्रता निश्चित करण्याचा कट-ऑफ दिनांक शुक्रवार, सप्टेंबर २०, २०१९ आहे.
क. कोणी व्यक्ती, ज्याने एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे भाग घेतले असतील आणि कंपनीचा सदस्य बनला असेल आणि कटऑफ दिनांक म्हणजेच शुक्रवार, सप्टेंबर २०, २०१९ रोजी भाग धारण करीत असेल, तो evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकेल. तथापि, जर व्यक्ती यापूर्वीच NSDL कडे यापूर्वीच नोंदणीकृत असल्यास त्याला विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड मतदान करण्याकरिता वापरता येईल. जर तुम्ही तुमचा पासवर्ड विसरला असाल, तर तुम्ही www.evoting.nsdl.com वर उपलब्ध "Forgot User Details/Password" पर्यायाचा वापर करून तुमचा पासवर्ड पुनः स्थापित करु शकता.
ड. सदस्यांनी नोंद घ्यावी की अ) रिमोट ई-मतदान यंत्रणा एनएसडीएल द्वारे उपरोल्लेखित दिनांक आणि वेळेनंतर मतदानाकरिता बंद केली जाईल आणि सदस्याने ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर त्या सदस्यास ते मत बदलता येणार आहे; ब) मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा ३५ व्या एजीएममध्ये उपलब्ध करून दिली जाईल; क) ३५ व्या एजीएमपूर्वी ज्या सदस्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मत दिलेले असेल ते देखील ३५ व्या एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतु त्यांचे मत पुन्हा देण्यास पात्र नसतील; आणि ड) ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदपटामध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदपटामध्ये कट-ऑफ दिनांकापर्यंत नोंदविलेले असेल, फक्त तेच रिमोट ईमतदान किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदान करण्यास पात्र असतील.
ई. ३५ व्या एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.rosemercltd.com वर देखील उपलब्ध आहे.
फ. कोणतेही प्रश्न असल्यास, www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड विभागामध्ये भागधारकांकरिता उपलब्ध सतत विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि भागधारकांकरिता ई-मतदान युजर मॅन्यूअल चा संदर्भ घ्यावा किंवा टोल फ्री क्र. १८००-२२२-९९० वर संपर्क साधावा किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवावी. सदस्य कोणत्याही अधिक स्पष्टीकरणासाठी कंपनीच्या श्रीमती जैनी जैन (सीएफओ) यांना कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात संपर्क साधू शकतात किंवा rmltd1985@gmail.com येथे ईमेल लिहू शकतात.

रोज मर्क लिमिटेड करिता
सही/-
किर्ती सावला
संचालक
ठिकाण : मुंबई
दिनांकः सप्टेंबर ४, २०१९ — **डीआयएनः ०२००३८७८**